REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.2331(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 7 | ISSUE - 7 | APRIL - 2018

# धुळे शहरातील मोलकरणींच्या राहणीमानाचा शोध अभ्यास



डॉ.कारभारी बबनराव दिवटे
उपप्राचार्य, मा.ध.पालेशा वाणिज्य महाविद्यालय, धुळे.

**सारांश**

मोलकरीण हेही एक देशाचे मनुष्यबळ आहे. देशाच्या विकास प्रक्रियेत स्त्रीयांचा सहभाग वाढत आहे. स्त्री घराबाहेर पडते तेव्हा घरातील कामे करण्यासाठी मोलकरीण असते. मोलकरीणमुळे घराबाहेर नोकरी वा व्यवसायासाठी बाहेर पडणाऱ्या स्त्रीयांना आधार मिळतो. परंतु मोलकरणींना आजही समाजात योग्य स्थान नाही म्हणून त्यांच्या राहणीमानाचा दर्जा फारसा उंचावलेला नाही. धुळे शहरात काम करणाऱ्या मोलकरणींचे राहणीमान यावरील संशोधन लेखासाठी स्वनिर्मित प्रश्नावली व मुलाखतीचा वापर करुन प्रस्तुत संशोधन हाती घेतले. प्राप्त माहितीच्या आधारे शेकडेवारी या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर करुन निष्कर्ष काढण्यात आले.

**मुख्य शब्द :** राहणीमान, मोलकरीण, राहण्याची व्यवस्था, भौतिक सुविधा, स्वच्छता गृह.

## • प्रास्ताविक

प्रत्येक देशाचा विकास हा त्या देशातील मनुष्यबळाच्या विकासावर अवलंबून असतो. प्रत्येक माणसात असलेल्या बळावर वा शक्तीवर त्याचे श्रम अवलंबून असतात. श्रमाचा अर्थ अत्यंत व्यापक आहे. आल्फ्रेड मार्शल यांच्यामते, 'आंनदाशिवाय इतर काही आर्थिक मोबदला मिळविण्याकरिता करण्यात आलेले मनुष्याचे सर्व शारीरिक व मानसिक प्रयत्न म्हणजे श्रम असतात.' (देशमुख, प्रभाकर पृ.१) वरील अर्थाने विचार केल्यास प्रत्येक मानवी उत्पादक घटक हा श्रम करतो व हया श्रमाबद्दल त्याला मोबदला प्राप्त होऊन त्याचे जीवन व्यवहार सुरळीतपणे पार पडते.

देशाच्या विकास प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढत आहे. महिलांचा सर्वात जास्त सहभाग घरेलु काम या क्षेत्रात आहे. ज्या कामांमध्ये धुणं धुणे, भांडी घासणे, घर झाडणे, लादी पुसणे, घरातील लहान मुलं, वृध्द, आजारी किंवा अपंग व्यक्ती, मानसिक रुग्ण इत्यादींची काळजी घेणे, घरगुती बागेचे काम करणे इत्यादी सर्व प्रकारच्या घरगुती स्वरुपाची कामे करणाऱ्या घरेलु कामाच्या क्षेत्रात महिला अधिक आढळतात. घरेलु काम करणाऱ्या महिला यांना मोलकरीण असेही म्हटले जाते. ज्याप्रमाणे देशातील नोकरदार महिला वर्गाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, त्याप्रमाणे घरेलु कामगारातील मोलकरणींचे प्रमाणही वाढत आहे. मोलकरणींवर घरातील जबाबदाऱ्या सोपवून महिला वर्ग मोठया प्रमाणात नोकरी धंदयासाठी घराबाहेर पडत आहेत. देशाच्या अर्थव्यवस्थेच्या विकासात मोलकरणींचा अप्रत्यक्षपणे मोठया प्रमाणात योगदान आहे. मोलकरणीचे काम हे अशिक्षित व अल्पशिक्षित महिलांसाठी एक महत्वाचे उत्पन्नाचे साधन आहे. वाढत्या शहरीकरणाने आणि विभक्त कुटुंब पध्दतीमुळे मोलकरणींना असलेली मागणी वाढत आहे. असे असले तरी समाजात महत्वपूर्ण असलेल्या या घटकाकडे दुर्लक्ष झाल्याचे निदर्शनास येते. राष्ट्राच्या विकासात अप्रत्यक्ष सहभाग असलेल्या या घटकाच्या राहणीमानाचा अभ्यास करणे. या मुख्य हेतुने प्रस्तुत शोध निबंध हाती घेतला आहे.

## • संशोधन समस्या विधान : धुळे शहरातील मोलकरणींच्या राहणीमानाचा शोध अभ्यास करणे.

मोलकरीणीच्या राहणीमानाचा अभ्यास करुन राहणीमानाचा दर्जा उंचावण्यासाठी उपाययोजना सुचविणे.

## • संशोधनाची गरज :

घरेलु कामगार व त्यातल्या त्यात मोलकरीण हा समाजाचा एक महत्वपूर्ण घटक आहे. तथापि, समाजाचे या घटकाकडे दुर्लक्ष आढळते. पुरुषाच्या बरोबरीने काम करण्यासाठी स्त्री घराबाहेर पडू लागली. स्पर्धेत टिकून राहण्यासाठी कामाच्या ठिकाणचा वाढता ताण-तणाव

सहन करु लागली. हे सर्व होतांना घरातील कामांकडे दुर्लक्ष होऊ लागले. घरातील ही जबाबदारी मोलकरीण स्वीकारत असल्याने स्त्रीला नोकरी धंदयाच्या ठिकाणी लक्ष केंद्रीत करता येत आहे. त्यामुळे मोलकरणीचे महत्व आधुनिक काळात वाढत आहे. असे असले तरी मोलकरणीकडे पाहण्याचा दृष्टीकोन अजून ही उदासिन आहे. मोलकरीण या महत्वपूर्ण सामाजिक घटकाच्या राहणीमाचा दर्जा याचा परिणाम समाजावर होतो. दर्जा चांगला असल्यास ती ज्या घरात काम करते;तेथे संतुष्टपणे काम करुन त्या घराचे ही राहणीमान उंचावू शकते. म्हणून मोलकरणीचे राहणीमान अभ्यासणे गरजेचे आहे.

प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षांनी समाजाला मोलकरणींच्या राहणीमानाविषयी सजगता येईल. शासनालाही राहणीमाना संदर्भात काही कायदेशीर उपाय योजून मोलकरणींना योग्य दर्जा देता येईल या सर्व पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन गरजेचे आहे.

- **संशोधन पध्दती**

एखाद्या विशिष्ट बाबतीत असलेली सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी उपयोगी पडणारी पध्दती ही सर्वेक्षण पध्दती असते. सर्वेक्षण म्हणजे प्रचलित तथ्यांचे संकलन, वर्णन, स्पष्टीकरण आणि मूल्यांकन असते. सर्वेक्षणातून वर्तमान स्थितीचे मूल्यांकन होऊन अधिक चांगल्या बदलांकरिता योग्य मार्गदर्शनही लाभत असते. सद्यस्थितीतील मोलकरणींच्या राहणीमानाचे मूल्यांकन करुन राहणीमानाचा दर्जा जाणून घेण्याचे प्रयोजन प्रस्तुत संशोधनात असल्याने संशोधनाची सर्वेक्षण पध्दती वापरली आहे.

- **जनसंख्या :** धुळे शहरातील सर्व महिला घरेलु कामगार म्हणजे मोलकरणी ही प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या आहे.

- **न्यादर्श :** प्रस्तुत संशोधनासाठी एकूण ३५ मोलकरीणींची निवड सरल यादृच्छिक नमुना निवड पध्दतीने केली आहे.

- **संशोधनाची उद्दिष्टे :** प्रस्तुत लघुसंशोधनाचा मुख्य उद्दिष्टे पुढीलप्रमाणे

१. धुळे शहरातील मोलकरणींच्या राहणीमानाचा अभ्यास करणे.
२. धुळे शहरातील मोलकरणींच्या राहणीमानाचा दर्जा संदर्भातील निष्कर्ष काढणे.

- **गृहीतके :** प्रस्तुत लघुसंशोधनाचा मुख्य गृहीतके पुढीलप्रमाणे

१. धुळे शहरातील घरेलु कामगारांमध्ये मोलकरणींचाही समावेश आहे.
२. धुळे शहरातील मोलकरणींचे राहणीमान सुधारत आहे.

- **संशोधनाची साधने :** प्रस्तुत संशोधनासाठी-

अ) प्राथमिक तथ्यविश्लेषणासाठी स्वनिर्मित प्रश्नावली व मुलाखत ही साधने वापरली.
ब) दुय्यम तथ्यविश्लेषणासाठी शासकीय अहवाल, प्रकल्प अहवाल, वर्तमानपत्रे, मासिक ही साधने वापरली आहेत.

- **संख्याशास्त्रीय विश्लेषण तंत्रे**

प्रस्तुत संशोधन हे लघुसंशोधन असून संकलित माहितीचे मूल्यांकन करावयाचे असल्याने सारणी व शेकडेवारी या संख्याशास्त्रीय परिमानांचा वापर केला आहे.

- **संशोधनाची मर्यादा :** प्रस्तुत लघुसंशोधन-

१. धुळे शहरापुरते मर्यादीत आहे.
२. धुळे शहरातील घरेलु कामगारांपैकी मोलकरणींपुरते मर्यादीत आहे.
३. धुळे शहरातील मोलकरणींच्या राहणीमानापुरते मर्यादीत आहे.
४. मोलकरणींचे राहणीमान या घटकातील घराची मालकी, घराचे स्वरुप, स्वच्छता गृहाची सोय, घरातील भौतिक सुविधा, शिधापत्रिका, राहणीमानातील सुधारणा होत आहे अथवा नाही या बाबींपुरते मर्यादीत आहे.

- **संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन :**

प्रश्नावली व मुलाखत या साधनांद्वारे प्राप्त माहितीवर सांख्यिकी प्रक्रिया करुन प्रत्येक बाबीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन पुढीलप्रमाणे-

**कोष्टक क्रमांक १ : घराची मालकी**

| मालकीचे स्वरुप | स्वत:चे | भाडयाचे | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | २३ | १२ | ३५ |
| शेकडा प्रमाण | ६६ | ३४ | १०० |

**अर्थनिर्वचन :**

घर हा राहणीमानाचा महत्वाचा निकष. मानवाच्या मुलभूत गरजांपैकी घर एक आवश्यक गरज. प्रत्येक व्यक्ती आपल्या अर्थिक कुवतीनुसार त्याची सोय करतो. वरील तक्त्यावरुन निदर्शनास येते बहुसंख्य मोलकरणींचे (६६%) स्वत:चे घर असून त्या त्यात वास्तव्य करतात.

**कोष्टक क्रमांक २ : घराचे स्वरुप**

| स्वरुप | पत्र्याचे | कौलारु | झोपडी | सिमेंट कॉंक्रीट | एकूण |
|---|---|---|---|---|---|
| संख्या | ३० | ०२ | ०१ | ०२ | ३५ |
| शेकडा प्रमाण | ८६ | ०६ | ०२ | ०६ | १०० |

**अर्थनिर्वचन :**

मोलकरणीचे उत्पन्न बेताचे असते. म्हणून बहुसंख्य मोलकरणी (८६%) पत्र्याच्या घरात राहतात; तर सिमेंट कॉंक्रीटच्या घरात राहणाऱ्या प्रमाण फार अल्प (६%) आहे.

**कोष्टक क्रमांक ३ : स्वच्छता गृहाची सोय**

| स्वच्छता गृहाची सोय | आहे | नाही | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | ०२ | ३३ | ३५ |
| शेकडा प्रमाण | ०६ | ९४ | १०० |

**अर्थनिर्वचन :**

घरामध्ये स्वच्छता गृहाची सोय असणे व्यक्तीच्या व समाजाच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे आहे. परंतु वरील कोष्टकावरुन निदर्शनास येते की, बहुसंख्य मोलकरणींच्या (९४%) घरात स्वच्छता गृहाची सोय नाही. घरात स्वच्छता गृह असणाऱ्याचे प्रमाण (६%) फारच नगण्य आहे.

**कोष्टक क्रमांक ४ : घरातील भौतिक सुविधा**

| तपशील | टी.व्ही. | मिक्सर | कपाट | मोबाईल | साईकल | दुचाकी/रिक्षा | पैकी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| संख्या | ३२ | ३३ | १२ | ३३ | २८ | ०४ | ३५ |
| शेकडा प्रमाण | ९१ | ९४ | ३४ | ९४ | ८० | ११ | १०० |

**अर्थनिर्वचन :**

प्रत्येक व्यक्ती स्वत:च्या आर्थिक कुवतीप्रमाणे भौतिक सुविधांचा लाभ घेत असतो. वरील तक्त्यावरुन निदर्शनास येते की, बहुसंख्य मोलकरणींकडे (९०% पेक्षा अधिक) भौतिक सुविधा उपलब्ध आहेत. रिक्षा व दुचाकीचा वापर कुटुंबातील अन्य व्यक्ती नोकरी वा इतर व्यवसायासाठी करतात.

**कोष्टक क्रमांक ५ : शिधापत्रिका**

| तपशील | शिधापत्रिका उपलब्ध | | | शिधापत्रिका प्रकार | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | होय | नाही | एकुण | पिवळा | केशरी | एकुण |
| संख्या | ३१ | ०४ | ३५ | ०९ | २२ | ३१ |
| शेकडा प्रमाण | ८९ | ११ | १०० | २९ | ७१ | १०० |

**अर्थनिर्वचन :**

शिधापत्रिकांसाठी आर्थिक उत्पन्नाचा निकष असतो. वरील तक्त्यावरुन निदर्शनास येते की बहुसंख्य मोलकरणींकडे (८९%) शिधापत्रिका असून त्यात केशरी शिधापत्रिका असणाऱ्यांचे प्रमाण (७१%) अधिक आहे.

**कोष्टक क्रमांक ६ : पगारी रजा**

| पगारी रजा | मिळते | मिळत नाही | एकूण |
|---|---|---|---|
| संख्या | ०२ | ३३ | ३५ |
| शेकडा प्रमाण | ०६ | ९४ | १०० |

**अर्थनिर्वचन :**

मोलकरीण ही सुध्दा श्रमीक या गटात मोडणारी कर्मचारी आहे. म्हणून कर्मचाऱ्यांना मिळणारी पगारी रजा त्यांनाही मिळावयास हवी. परंतु वरील कोष्टकावरुन निदर्शनास येते की, बहुसंख्य मोलकरणींना (९४%) पगारी रजा न मिळता रजेचा दिवसाचा पगार कापला जातो.

**कोष्टक क्रमांक ७ : राहणीमानातील सुधारणा**

| राहणीमानात सुधारणा | आहे | नाही | अल्प प्रमाणात | एकुण |
|---|---|---|---|---|
| संख्या | ११ | १७ | ०७ | ३५ |
| शेकडा प्रमाण | ३१ | ४९ | २० | १०० |

**अर्थनिर्वचन :**

स्वकष्ट, मिळणारा लाभ, काटकसर यामुळे राहणीमानाचा दर्जा उंचावतो. वरील कोष्टकावरुन निदर्शनास येते की, बहुसंख्य मोलकरणींचा (४९%) राहणीमानाचा दर्जा सुधारत नाही. तर २०% मोलकरणींचा दर्जा अल्प प्रमाणात सुधारला आहे.

- **निष्कर्ष :**

प्राप्त माहिती, सांख्यिकी विश्लेषण व प्रत्यक्ष निरीक्षण मुलाखतीतून पुढीलप्रमाणे निष्कर्ष काढता येतील.

१. मोलकरणींचे स्वतःचे घर असून बहुसंख्यांचे ते पत्र्याचे घर आहे. घराच्या स्वरुपात राहणीमानाचा दर्जा अवलंबून असतो. म्हणून मोलकरणींना सुयोग्य घराच्या उपलब्धतेचा विचार करणे आवश्यक आहे.

२. बहुसंख्य मोलकरणींच्या घरात स्वच्छता गृह नाही. स्वच्छता गृह ही आवश्यक गरज आहे. भारताच्या स्वच्छता अभियानांतर्गत या बाबीचा गाभीर्याने विचार होण्याची गरज आहे.

३. मोलकरणींच्या घरात भौतिक सोयी व सुविधा पर्याप्त प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यात टी.व्ही. व मिक्सरचे प्रमाण अधिक आढळते. म्हणजे मोलकरणीचा कल मनोरंजन व कमी कष्टदायक काम याकडे अधिक असतो. स्वच्छता गृह ही अत्यावश्क बाब व त्यासाठी टी.व्ही. द्वारे होणारी जगजागृती, पर्यावरण संरक्षण कार्यक्रम पाहणे यापेक्षा मनोरंजनाकडे मोलकरणींचा अधिक कल आहे. म्हणून यासंदर्भात त्याचे उद्बोधन गरजेचे आहे.

४. शासनाच्या शिधापत्रिकेचा लाभ मोलकरणींना मिळत आहे; तरी त्यांच्या राहणीमानात सुधारणा नाही. शिधापत्रिका योजना अधिक प्रभावी राबविणे आवश्यक आहे.

५. मोलकरणींना पगारी रजा मिळत नाही. वस्तुतः त्याही कर्मचारी वर्गात मोडतात. म्हणून कर्मचाऱ्यांना देय असलेली किरकोळ रजा, प्रसुती रजा, इ. त्यांचे हक्क आहेत. परंतु ते डावलले जातात.

६. मोलकरणींचा राहणीमानाचा दर्जा सुधारलेला नाही.

७. केवळ घरकाम करणे, घरातील श्रमाची कामे करणे याकडे मोलकरणींचा कल आहे. त्यांना कौशल्य विकास, पूरक व्यवसाय यांचे प्रशिक्षण उपलब्ध नाही व त्यासंदर्भात त्यांच्यात सजगता नाही.

८. मोलकरणींच्या संदर्भात शासनाचे ठोस कायदे नाहीत. त्यांच्या नोकरीची शाश्वती नाही.

- **संदर्भ**

१. देशमुख, प्रभाकर.(१९८७). *श्रमाचे अर्थशास्त्र.* नागपूर : विद्या प्रकाशन.

२. नेरकर, दिलीप.(१९७५). *श्रम समस्या आणि संबंध.* नागपूर : मंगेश प्रकाशन.

३. भारत सरकार (२०१०). *घरेलु कामगार कल्याण आणि सामाजिक सुरक्षितता कायदा,* नवी दिल्ली.

४. कामगार व रोजगार मंत्रालय.(२०११). *घरेलु कामगार कृती समितीचा अंतिम अहवाल,* नवी दिल्ली.

५. शिंदे, एस.जी.(जुलै,२०१४,अंक-३,खंड-३). *असंघटीत क्षेत्रातील कामगार : मोलकरणींची स्थिती*, जर्नल ऑफ कॉमर्स अँण्ड मॅनेजमेंट थॉट.

६. मुळे, रा.शं., उमाठे वि.तु. (१९८७). *शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे*. नागपूर : महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ.

७. *The Domestic Workers (Registration Social Security and Welfare) Act, 2008, New Delhi, Government of India.*



**डॉ.कारभारी बबनराव दिवटे**
**उपप्राचार्य, मा.ध.पालेशा वाणिज्य महाविद्यालय, धुळे.**